# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
## राष्ट्रीय सेवा योजना

दुरध्वनी : ०७१२-२६६०९४७ Email : directornss@sgbau.ac.in

क्र.संगाबाअवि/१७/१५५/२०१७
दिनांक : १४.०८.२०१७

प्रति,
मा.प्राचार्य,
सर्व संलग्नित रासेयो महाविद्यालये,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.

**विषय : १) गणतंत्र दिन पथसंचालन व उत्कर्ष सामाजिक व सांस्कृतिक राज्यस्तरीय स्पर्धेकरीता निवड चाचणी शिबिरासाठी विद्यापीठात स्वयंसेवक पाठविणेबाबत..**

**२) रासेयो वार्षिक शुल्क रु. १०/- विद्यापीठ खाती जमा करण्याबाबत...**

**संदर्भ : रासेयो/२०१७/प्र.क्र.११३/१७/साशि-७ दि. १२ जुलै, २०१७**

**महोदय,**

संदर्भाकित शासन पत्रानुसार पुर्व राष्ट्रीय व राज्यस्तरीय प्रजासत्ताक दिन पथसंचालन शिबिराचे आयोजन सोलापूर विद्यापीठ, सोलापूर येथे दिनाक ८ ते १० सप्टेंबर, २०१७ या कालावधीत आयोजित करण्यात आलेले आहे.

प्रत्येक सत्रामध्य विद्यापीठ स्तरावर गणतंत्र दिन पथसंचालन व राज्यस्तरीय उत्कर्ष-सामाजिक व सांस्कृतिक निवड चाचणी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. राज्य व राष्ट्रीय स्तरावरील गणतंत्र दिन पथसंचालनाकरीता पात्र रासेयो स्वयंसेवकांची निवड होणे आवश्यक असते. विद्यापीठस्तरीय निचड चाचणी करीता खालीलप्रमाणे शासनाने निर्देशित केल्यानुसार पात्र स्वयंसेवकांची निवड करुनच विद्यापीठस्तरीय निवड चाचणी कार्यक्रमाला स्वयंसेवक पाठविणे आवश्यक आहे. **दिनांक २३ व २४ ऑगस्ट, २०१७** या कालावधीत विद्यार्थी भवन, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ येथे निवड चाचणीचे आयोजन करण्यात आले आहे.

उपरोक्त निवड चाचणी कार्यक्रमाकरीता आपल्या महाविद्यालयातील खालीलप्रमाणे नमूद पात्रतेचे दोन विद्यार्थी (एक मुलगा व एक मुलगी) महिला महाविद्यालय असल्यास दोन विद्यार्थीनी कृपया पाठवाव्या.

**राज्य व राष्ट्रीय स्तरावरील गणतंत्रदिन पथसंचालन शिबिराकरीता**

**A) Physical eligibility:**

(i) Should be from Graduation Degree Level only
(ii) Should have completed one-year volunteer ship
(iii) Should be unmarried
(iv) Should be physically fit to participate in R.D.Parade Camp activities
(v) Height: 155 - 165 cm for girls and 165 -175 cm for boys
(vi) Weight: There should be no evidence of weak constitution, bodily defects or under weight or obese
(vii) Chest: Fully expanded chest should not be less than 80cm (boys) and 75cm (girls). The minimum range of expansion after full inspiration should be cm
(viii) The qualifying physical standard are as under:
Should be able to run up to 2Km in 15 minutes Pushups and sit ups (minimum 20 for boys and 15 for girls)
Chin ups (minimum 08 for boys and 05 for girls)

**B) Cultural Skill:**

(i) Should have continuous training in the performing field for a minimum of 3 years or belong to a traditional performing artist's family.
(ii) Should have won a prize in the University or State level performances. Overall performance in Physical fitness, Parade & cultural talent has to be judged for selecting the volunteers.

उपरोक्त कार्यक्रमाला आपल्या महाविद्यालयातील वरील पात्रता पूर्ण करणारे दोन स्वंयसेवक (एक मुलगा व एक मुलगी) निवड चाचणी कार्यक्रमाकरीता **बुधवार दिनांक २३ ऑगस्ट, २०१७ रोजी सकाळी ११.०० वाजेपर्यंत** स्वयंसेवक पोहचतील या बेताने पाठवावे. निवास व भोजन व्यवस्था विद्यापीठामार्फत करण्यात आलेली आहे. पथसंचालन व सांस्कृतिक कार्यक्रमाचे अनुषंगाने गायन, वक्तृत्व शैली, वाद्य संगीत इ.कलागुण अवगत असलेले स्वयंसेवक, आवश्यक साहित्य तसेच कापडी बुट, सतरंजी, कपडे व महाविद्यालयाचे शिफारस पत्रासह विद्यार्थी कृपया पाठवावे. संबंधितांना सूचित करावे.

राष्ट्रीय सेवा योजनेमध्ये नामांकन करण्यात आलेल्या स्वयंसेवकाकडून रासेयो वार्षिक शुल्क रु. १०/- प्रति विद्यार्थी वसुल करुन महाविद्यालयाला मंजुर केलेल्या रासेयो विद्यार्थी संख्येनुसार एकूण राशी विद्यापीठखाती कुलसचिव, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांचे नांवे धनाकर्षाद्वारे दिनांक ५ सप्टेंबर, २०१७ पूर्वी कृपया जमा करावे.

ज्या महाविद्यालयांनी मागील सत्राचे रासेयो वार्षिक शुल्क जमा केलेले नाही त्या महाविद्यालयाची थकीत राशी दंडात्मक कार्यवाही म्हणून त्यांच्या अनुदानातून वसुल करण्यात येते. कृपया या संदर्भात नोंद घेवून रासेयो करीता मंजुर विद्यार्थी संख्येप्रमाणे नामांकन करुन विद्यार्थी यादी(नामांकन क्रमांकासह) व रासेयो वार्षिक शुल्क निर्धारीत कालावधीत विद्यापीठाला सादर करण्याबाबत संबंधितांना कृपया सूचित करावे.

सदर माहिती ही विद्यापीठाचे www.sgbau.ac.in या संकेतस्थळावरील N.S.S. या मुख्यशीर्षातील National Service Scheme या उपशिर्षामध्ये प्रसिध्द करण्यात आले आहे. कृपया नोंद घ्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. अविनाश असनारे)**
संचालक,
राष्ट्रीय सेवा योजना,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ